Impact Factor-8.632 (SJIF) ISSN 2278-9308

Issue No

(CDLXVI) 471

B


# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## March 2024

## Cooperative Sector in India: Opportunities and Challenges




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development
Training Institute, Amravati.

Late. Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Impact Factor – 8.632, ISSN – 2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## March -2024

ISSUE No - (CDLXVI ) 471 -B

## Cooperative Sector in India: Opportunities and Challenges

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B

ISSN : 2278-9308
March 2024

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Co-Opertaive Movement In India | Mr. Kolekar G.K. , Prof. Dr. S.M. Kolhe | 1 |
| 2 | The Co-Operative Banking Sector developments In India And Challenges | Dr.Narayan Vinod Kadubal | 4 |
| 3 | Human Resource Development: Challenges before Cooperative Dairy Business Management in Maharashtra | Dr. Sambhaji V. Mane | 8 |
| 4 | Performance of PMFBY in Mrathwada Region | Asst. Prof. Dr. Vishnukant Shelke | 13 |
| 5 | Performance of Deogiri Nagari Sahakari Bank Ltd. Chhatrapati Sambhajinagar | Dr. Rajendra . L. Kable | 17 |
| 6 | Co-Operative Collection Development Of A Library | Dr. Sarkale Anant B. | 22 |
| 7 | A study of benefits and challenges faced by Co-operative Banks in India | Dr. Laxmikant Nandkishor Soni | 27 |
| 8 | Women empowerment through Co-operative institutions | Arti Atmaram Waghmare , Dr. Pradeep D. Shelke | 31 |
| 9 | Urban Cooperative Banks: Helping Hand for Small Economic Activities | Dr.Baswaraj B. Lakshete | 34 |
| 10 | Opportunities and Challenges before Cooperative Banks in India | Rindakwale Ajay Balaji ,Dr. N. H. Awade | 39 |
| 11 | Role of Co-operation in Rural Development | Dr. Pradeep D. Shelke | 43 |
| 12 | A Study of the Financial Performance and Problemsof Selected Non-Scheduled Urban Co-Operative Banks with Special Preference To Pune District | Vaibhav Suryawanshi | 46 |
| 13 | Role of Cooperation in Economic Development in India | Mr. Narendra Ramakant Chole , Dr. P. D Shelke | 55 |
| 14 | भारतातील सहकारी बँकिंगक्षेत्राची रचना | डॉ. मारुती बाबुराव कातकडे | 58 |
| 15 | प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था:कार्य, समस्या आणि उपाय | प्रोफेसर डॉ. मारोती कच्छवे | 62 |
| 16 | महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय : प्रगती, समस्या व उपाययोजना. | डॉ. प्रोफेसर काळे बी. एम. | 69 |
| 17 | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका | प्रा. डॉ. टी, एम. गुरुनुले | 73 |
| 18 | भारतातील सहकारी आंदोलनाचा इतिहास | डॉ.मोहन मिसाळ | 76 |
| 19 | कृषीधान्य साठवणुकीच्या सहकारी गोदामासमोरील संधी आणि आव्हाने | डॉ.डी.बी. कोनाळे , राहुल व्यंकटराव | 79 |
| 20 | सहकारी कायदे व नियम | डॉ.सदानंद राजाराम वडजे | 83 |




Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

| | | |
|---|---|---|
| 21 | भारतातील सहकारी शेती —फायदे –दोष — प्रा. डॉ फाजगे अंगद के. | 87 |
| 22 | सहकार क्षेत्रामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेचे योगदान — मोरे सपना गोविंद | 93 |
| 23 | सहकार क्षेत्रा पुढील आव्हाने व उपाय — डॉ. जाधव विजु दत्तात्रय | 97 |
| 24 | सहकारी कृषी उद्योगातील नव उद्योजकता — प्रा. डॉ. भारत निर्वळ , रविंद्र भिकाजी भिसे | 103 |
| 25 | सहकार समृद्धी धोरणात संवादाची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास — डॉ. नामदेव सानप | 107 |
| 26 | महाराष्ट्रातील सहकारी दुग्ध व्यवसायाची सद्यस्थिती :समस्या व उपाय — प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर | 117 |
| 27 | महाराष्ट्राच्या आर्थिक उभारणीत सहकाराचे योगदान — प्रा.डॉ.बी.आर. शिंदे | 125 |
| 28 | सहकारी पतसंस्थासमोरील संधी आणि आव्हाने — कोकरे हर्षकुमार विश्वनाथ | 128 |
| 29 | आर्थिक विकासात सहकाराची भूमिका - एक अभ्यास — वर्षा सिताराम धुतमल | 132 |
| 30 | A Case Study of anImpact of E-Commerce In Supporting Small Businessesin India — *Dr. Phole Kamal Bhaurao* | 136 |
| 31 | A Study of Maharashtra State Co-operative Bank: it's Problems and Remedies — **Dr. Rajesh Murlidhar Jadhav** | 141 |
| 32 | A Study on customer attitude& awareness towards E-commerce shopping apps with special reference to rural youth — **Dr.Adkine S.B., Rotte Sai Akash** | 144 |
| 33 | Study of Women's Participation In Activities of Co-operative Housing Societies With Reference to Thane City. — **Asst.Prof. CA Atul A. Raut, Dr. H. S. Patange** | 151 |
| 34 | A Study Of Non-Performing Assets And Its Impact On The Banking System In India — **Suraj Digambar Bansode, Dr. B.T. Chavan** | 158 |
| 35 | Empowering Communities: Exploring Cooperative Entrepreneurship in India — **Asst. Prof. Sushil Madanrao Gangane** | 161 |
| 36 | सहकारी तत्वावरील भारतीय दुग्ध पदार्थ निर्मिती : एक चिकित्सक अभ्यास — सुदर्शन मधुकर मलकापुरे | 169 |
| 37 | आप्पासाहेब खोतांच्या कथेतील सहकार चित्रण आणि हतबल शेतकरी — प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये | 173 |
| 38 | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व सुधारणा — डॉ. कल्याण गोलेकर | 177 |
| 39 | महिला सक्षमीकरणात सहकाराची भूमिका — डॉ सुनिता आत्माराम टेंगसे | 183 |
| 40 | Farmer Producer Companies in Latur District: A Study — **Pavan V. Patil, Dr. Naresh V. Pinamkar,** | 187 |


Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308
March 2024

# आप्पासाहेब खोतांच्या कथेतील सहकार चित्रण आणि हतबल शेतकरी

प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी (महाराष्ट्र)
संपर्क: ९१५८०६४०६८

प्रस्तावना:

वाङ्मय हे समाजाचा आरसा असते. सातत्याने बदलत्या काळाचे भान आणि जाण साहित्यातून चित्रित होत असते. त्यामुळेच साहित्याला समाजमनाचा आरसा म्हटले जाते. जसा काळ बदलत जाईल आणि काळासमोरील आव्हाने उभी असतील तसे साहित्य आपली कूस बदलत असते. त्या त्या परिस्थितीत लेखन आपली कात टाकत असते. त्या सर्वच बाबींचे चित्रण कथा, कादंबरी, कविता, निबंध किंवा इतर प्रकारचे लेखन, चिंतन आणि त्यावर मंथन होत राहिले पाहिजे. ती काळाची निकड मानली जाते. असे झाल्यास त्या त्या काळातील मूलगामी समस्या समाजासमोर येवून लोकांना त्याची ओळख होत असते. भारतातील सहकाराचा इतिहास काही फार जुना नाही. अलीकडच्या उणेपुरे शंभर वर्षाच्या आत बाहेरील हा इतिहास आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्रात तर सहकार अगदी तारुण्यातच आहे असे म्हणायला हरकत नाही. सहकार क्षेत्राचा प्रारंभ महान उद्देशाने झाला. पश्चिम महाराष्ट्र यात अग्रेसर राहिलेला दिसतो आणि तिकडूनच याची पाळेमुळे महाराष्ट्रभर पसरलेली दिसतात. साधारणतः देश स्वतंत्र झाल्यानंतर महाराष्ट्रात सहकार चळवळीने जोर धरलेला दिसून येतो. सहकार म्हणजे काय? याचे विस्ताराने उत्तर मराठी विश्वकोशात, "मानव जातीतील समूहजीवन जगण्याची उपजत असणारी सहजप्रवृत्ती तसेच पारस्परिक सहकार्य करण्याची पद्धत. तांत्रिकदृष्टया सहकार म्हणजे विशेष पद्धतीने व्यवसाय करण्याचा प्रकार"[१] अशी सापडते. सहकार म्हणजे माणसाची मुलभूत गरज, ज्याच्यातून काही माणसे काही महत्वपूर्ण सामुहिक ध्येय घेऊन एकत्र येतात आणि आपल्यासह आपल्या सोबतच्या, भोवतालच्या समाजाचा सर्वांगीण विकास साधतात. असे असतांना महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात अनेक उद्योग धंदे उदयास आले. यातून हजारो हातांना काम मिळाले, तर लाखो कुटुंबे उभी राहिली. असे असले तरी प्रत्येक गोष्टीला ज्याप्रमाणात चढता क्रम असतो त्याच न्यायाने त्याला उतरती कळासुद्धा लागत असते. त्याच न्यायाने सुरुवातीला महाराष्ट्रात सगळीकडे सहकार तत्वावर साखर कारखाने आणि सूत गिरण्या उभ्या राहिल्या. त्यानंतर १९९१ ला देशाचे अर्थकारण बदलले. खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाने देशाचे चित्रच बदलले. या कारखानदारीवरचे शासनाचे नियंत्रण उठले. खाजगीकरणाचे वारे कारखानदारांच्या नाकात शिरले. याचा परिणाम म्हणजे देशातील राजकारणही बदलले. राजकारणातील देशप्रेम, नीती, तत्वे, समाजसुधारणा, तीस टक्के राजकारण आणि सत्तर टक्के समाजकारण करणारी जुनी-जाणती, पहिल्या पिढीची मंडळी राजकारणातून निवृत्त झाली तर काही निवर्तली. राजकारणात नव्या, तरूण पिढीचा शिरकाव झाला. आयत्या पिठावर रेघोट्या ओढणारी, प्रस्थापित मानसिकतेतून आणि धनदांडग्या घरातून मंडळी राजकारणात आली. त्यांची ध्येय, धोरणे बदलली. देशाचे राजकारण, त्याच्या जोडीने अर्थकारण आणि त्या बरोबरीने बदललेली पिढी याचा दूरगामी परिणाम सर्वच क्षेत्रावर झाला. त्यात सहकार क्षेत्रही दुर्लक्षित राहिले नाही. लोकांच्या आणि समाजाच्या उत्थानासाठी उभे राहिलेले साखर कारखाने, दुध डेअरी आणि सुत गिरण्या आपल्या बापाची मालमत्ता समजून इथल्या कुंपणांनीचे शेते खाऊन टाकली. कारखानदारांनी कारखाने, जमिनी सर्व काही पचवून ढेकर दिला. असे असले तरी ज्यांचा संसार आणि सालाभाराची चूल ज्या कारखाना, सुत गिरणी अथवा दुध डेअरीवर अवलंबून होती त्यांचे हाल सुरु झाले.

अगोदरच अठराविश्व दारिद्र्य पाचवीला पुजलेलं असतांना कारखान्यांची आणि सहकारी तत्वावर उभे राहिलेल्या आस्थापनांची अशी झालेली धूळधाण छोटा शेतकरी, कास्तकार आणि मजुरांच्या जिंदगीवर दगड होऊन पडली. बिचाऱ्यांचे संसार कोलमडून पडाय लागले. अशातच मग कारखानदार आणि त्याला जोडून अनेकांची एक फळी तयार झाली. सगळे बगळे फक्त माशावर लक्ष ठेवून होते. त्यात त्यांना सहज गिळता येणारा एक मासा म्हणजे ऊसवाला शेतकरी किंवा म्हैस पाळलेला शेतकरी. त्याच्या नंतर दुसरा मासा म्हणजे हातावर पोट असणारा ऊसतोड



Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

कामगार. असे सगळे चित्र बदलत गेले आणि याचे चित्रण मराठी साहित्यात यायला लागले. अनेक कथा, कादंबऱ्या यायला लागल्या. त्यात श्रीराम गुंदेकर, भास्कर बडे, सरदार जाधव, दिनकर जायभाये, रामचंद्र दवंगे, कैलास दौंड, योगीराज वाघमारे, शांता जोशी, डॉ.नारायणराव मुंढे, योगीराज बागुल इत्यादी सृजनांनी आपल्या घरातील, अनुभवातील, भोवताल घडणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या व्यथांचे चित्रण आपल्या कविता, कथा, कादंबरीतून केलेले आढळून येते. "आई बाप ऊस तोडायला जायचे. दिवाळीपर्यंत रम्य दररोज शाळेत जायचा. पुढं कारखाने सुरु होत. ऊसतोड कामगारांना पोट भरण्यासाठी कारखान्याचे वेध लागत."[२] असं जिवंत चित्रण कैलास दौंड यांच्या *पाणधुई* कादंबरीत वाचायला मिळते. अलीकडच्या काळात कारखान्यावर आणि दुध डेअरीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था आणखीनच वाईट झालेली आढळून येते. त्यात ज्ञानेश्वर जाधवर, परशुराम नागरगोजे, अप्पासाहेब खोत, शंकर विभूते, जयद्रथ जाधव इत्यादी अलीकडच्या साहित्यिकांनी या कामगारांच्या व्यथांचे चित्रण मांडायला सुरुवात केली. त्यात २०२२ साली पश्चिम महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथाकार, कादंबरीकार प्रा.आप्पासाहेब खोत यांचा *काळीज विकल्याची गोष्ट* हा कथासंग्रह प्रकाशित झाला आणि त्यातून सगळ्या प्रस्थापितांच्या ढोंगीपणाची लक्तरे वेशीवर लटकताना पाहायला मिळाली.

**आप्पासाहेब खोत यांच्या कथेतील सहकार चित्रण आणि हतबल शेतकरी:**

एकविसाव्या शतकातील मराठी वाङ्मयाच्या इतिहासात नवनवीन कथाकार, कादंबरीकार, कवी इत्यादी लेखकांचा उदय झाला. यात आप्पासाहेब खोत हे मोठ्या अग्रक्रमाने घेतले जाणारे एक नाव आहे. कादंबरी आणि कथा लेखक असणारे प्रा.आप्पासाहेब खोत हे सुप्रसिद्ध कथाकार म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. आत्तापर्यंत जवळपास सतरा ग्रंथाचे लेखन खोत सरांनी केले असून अनेक पुरस्कारांनी सरांचा गौरव झालेला आहे. *पळसफूल, गाव पांढर, गाव पांढरीच्या वाटेवर, घरपण, फेसाटी, सावलीची सोबत* इत्यादी कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. *गवनेर, महापूर, रानगंगा, कळवंड, माती आणि कागुद, मरणादारी, वापसा* इत्यादी कथासंग्रह आणि *अनवाणी पाय, चांदवडी रुपया* आदि ललित गद्य सरांच्या नावावर आहेत. असे समृद्ध लेखन करणारे खोत सर अनेक पुरस्कारांनी सन्मानित झाले आहेत. ग.ल.ठोकळ पुरस्कार २००७, महाराष्ट्र शासन उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार १९९९-२०००, वी.रघुनाथ साहित्य पुरस्कार २००५-०६, कृष्णतिर साहित्यभूषण पुरस्कार वाई, आचार्य प्र.के.अत्रे पुरस्कार, कै.भि.ग.रोहमारे साहित्य पुरस्कार इत्यादी सन्मानजनक पुरस्काराने खोत सरांचे साहित्य गौरविले आहे. त्याचबरोबर त्यांच्या अनेक कथा शालेय तसेच विद्यापीठ अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्या आहेत. खोत सर हे अलीकडच्या काळातील कथा आणि कादंबरीतील नामांकित नावांपैकी एक नाव म्हणून घेतले जाते. त्यांचा एक वाचक वर्ग संपूर्ण महाराष्ट्रात पाहायला मिळतो. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथाकार आसाराम लोमटे, "आप्पासाहेब खोत यांनी कथाकथनाच्या माध्यमातून ग्रामीण जीवन दर्शनाची कथा सर्वदूर पोहोचवली. त्यांच्या कथेचा स्वतःचा असा चाहता वर्ग आहे."[३] असे लिहून आप्पासाहेब खोत सरांचे लेखनाचे श्रेष्ठत्व अधोरेखित करतात.

आप्पासाहेब खोत सरांचा *काळीज विकल्याची गोष्ट* हा कथासंग्रह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दुःखाचे जिवंत चित्रण करणारा उत्तम कथासंग्रह असून त्यात एकूण तेरा कथांचा समावेश आहे. जवळपास सर्वच कथा ह्या शेती, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या व्यथांना अभिव्यक्त होणाऱ्या आहेत. या कथासंग्रातील पहिलीच 'काळीज विकल्याची गोष्ट' ही कथा माणसाला अत्यंत भावनिक करून बैल आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या नात्याचे हृद्य वर्णन करताना दिसते. या कथासंग्रहातील चार कथा ह्या उसतोड कामगारांच्या जीवनाच्या व्यथा चित्रित करणाऱ्या असून त्यातील दोन कथा मात्र सहकार क्षेत्र कसे आतून पोखरून निघाले आहे याचे विदारक चित्र उभे करतात. या कथासंग्रहातील तिसरी 'दुध आणि फॅट' ही कथा मोठी बोलकी आहे. महाराष्ट्रात ऊस कारखानदारांची जशी एक साखळी तयार झाली त्याप्रमाणात दुध डेअरी वाल्यांची साखळी दिसून येत नसली तरी त्यांचे साखर कारखानदारांच्या तुलनेत बरेच दोन नंबरचे धंदे सुरु असतात. याचे चित्रण आप्पासाहेब खोत यांच्या काही कथांमध्ये स्पष्टपणे दिसते. गरीब, कास्तकार शेतकरी बिचारा किती आपुलकीने आणि इमानदारीने आपल्या म्हशीचे दुध डेअरीला घालतो याचे 'दुध आणि फॅट' ही कथा उत्तम उदाहरण आहे. रंजना आणि बाजीरावच्या डेअरीच्या दुधाची ही कथा आहे. घरून निकं दुध घेऊन जाऊनही



Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B

ISSN : 2278-9308
March 2024

डेअरीवाल्याची मशीन फॅट कमीच दाखवते. दुध घेणाऱ्या मुलाला बाजीरावाने विचारल्यावर, मशीन जे दाखवते तेच दाखवतो आहोत असे म्हणून तो मुलगा बाजीरावची तक्रार परतवून लावतो. दररोज दोनवेळा दहा दहा म्हणजे वीस लिटर दुध घालून बाजीरावाचे लिटरमागे दोन रुपये म्हणजे रोजचे चाळीस रुपये डेअरीवाला दुधाची चोरी करतो. "भंजी आपल्या सारख्या गोर-गरीबाची ही पुढारी किती लुबाडत्यात बघा की?" त्यावर, "मढ्याच्या तोंडचं लोणी खाणारी औलादच म्हणायची. गोर गरीबाची कोणी धनीच उरला नाही बघ."[४] असं म्हणून बाजीराव आणि त्याची पत्नी व्यवस्थेपुढे हतबल झालेली दिसून येतात. याउलट डेअरीच्या चेअरमनच्या भावकीतील, मर्जीतला दुधवाल्याला डेअरी मात्र फॅट चांगलं लावून भाव देतात. मग रंजना तक्रार करण्याची भाषा करते. तेंव्हा, "काय फायदा न्हाई. सारी गरीब मानसं कशाला त्याच्या नादी लागत्याल? तशात ऍडव्हान्स देऊन चेअरमनने त्याशी मिंधी करून ठेवलेलं असतंया."[५] असं सगळं चित्र बाजीराव रंजनाजवळ बोलून शांत होतो. त्यानंतर शहरात शिकणारा त्यांचा मुलगा अनिल गावी आला. त्याच्या आईनं त्याच्या कानावर ही सगळी हकीकत घातली. अनिलने दुध डेअरी वरील अगोदरच्या फॅट तपासणारा आपला वर्गमित्र मोहनची भेट घेतली आणि मोहनने दुध डेअरीत होणारा मोठा घोटाळा आणि भ्रष्टाचार अनिलला सांगितला. "दुध डेअरीचा चेअरमन ते स्वतः, संचालक मंडळ त्यांच्याच हितचिंतकाचं. दुध डेअरी सहकारी, पण मालक तेच ना? ते म्हणतील तो कायदा आणि ते सांगतील ती पूर्वदिशा."[६] असं डेअरीच्या भ्रष्टाचाराचं एकेक गुपित मोहननं अनिलसमोर उघड केलं. म्हातारा माणूस दुध घेऊन आला की; फॅट कमी आणि तरूण मुलगी आली की फॅट जादा. "डेअरी म्हणजे चोराच्या हाती खाजाण्याच्या किल्ल्या." एवढंच काय? डेअरीतून डेअरी संस्थापकाचे अनेक फायदे होतात. आपल्या लोकांना कमी किमतीत पशु खाद्य देता येते. माल जास्तीचा दाखवून बिल उचलता येते. आपल्या नातेवाईकांना जास्तीच्या रकमा दिल्या जातात तर सामान्य, गोरगरीब दुध घालणाऱ्या सभासदांना पशुखाद्य, अनुदान दिलं जात नाही. काही प्रश्न विचारलाच तर, "ये. पायजे तर उद्यापासून दुध घालू नका" अशी धमकी देवून बोलती बंद केली जायची. याचा परिणाम म्हणजे साधी मोटार सायकल नसलेल्या दुध डेअरीच्या संस्थापकाकडे महागडी गाडी, मोठा दोन मजली बंगला आणि अलीकडच्या पाच वर्षात दहा एकर शेती खरेदी होते. एवढं सगळं डेअरीच्या भ्रष्टाचारातून उदयाला आले. हे सगळं ऐकून अनिलचे खटकन डोळे उघडतात. तात्काळ अनिलने जिल्हा दूध संघाला एक अर्ज केला. याचा परिणाम म्हणजे त्याच्या दुधाला फॅट असलेल्या दुधाचा भाव मिळू लागला. व्यवस्थेने पिचलेल्या शेतकऱ्याचे चित्रण करतांना आप्पासाहेब खोत वाचकांच्या आणि समीक्षकाच्या एकदाच काळजाला हात घालतात. इथली सहकार व्यवस्था कशी मुजोर झाली असून कास्तकार लोकांच्या कष्टाचे लुटून खाण्याचे पाप करत आहे.

प्रा.आप्पासाहेब खोत सरांची प्रस्तुत कथा म्हणजे महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचे प्रातिनिधिक स्वरुपात विदारक चित्रण आहे. खोत सर हे मोठे अनुभवी आणि उंची-खोलीचे लेखक आहेत. त्यांनी शेतकऱ्यांचे जीवन अगदी जवळून अनुभवले असून इथल्या सहकार व्यवस्थेने इथला शेतकरी कसा संपूर्ण रस गळाल्यानंतर चरकातून बाहेर पडणाऱ्या ऊसाच्या लगद्यासारखा निस्तेज, शक्तिहीन, असहाय झालेला आहे हे लक्षात येते. "अनिलनं काहीही न बोलता आपल्या गरीब वडिलांच्याकडं पाहिलं. चेहऱ्यावरच्या आणि उभ्या देहावरील काबाड कष्टानं पडलेल्या सुरकुत्या स्पष्ट दिसत होत्या. डोक्याचं केस विरळ झालेलं. त्यातलं निम्मं-अर्धं केस पांढरं झालेलं. खोल खोल गेलेले डोळे. गालफाडं आत गेलेली. डोळ्याखाली जमा झालेली काळी वर्तुळ. अगतिक नजर आणि त्या नजरेत न सुटणाऱ्या प्रश्नांची कोंडी." दुध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचे असे विदारक चित्र उभं करतांना खोत सर सहकार आणि राजकारणी लोकासमोर हे चित्र उभं करतांना वर्तमान व्यवस्थेसमोर अनेक प्रश्न उपस्थित करतात. महाराष्ट्रातील सहकार हे खऱ्या अर्थाने स्वाहःकार क्षेत्र झाले आहे. एकीकडे कास्तकार आणि शेतकऱ्याच्या अंगावर मुठभर मास दिसून येत नाही तर दुसरीकडे डेअरीवाले, कारखानदार शेतकऱ्यांचे रक्त शोषून बंब फुगले आहेत. शेतकऱ्याच्या जीवावर एसी गाड्यात फिरणारे हे पांढरे कपडे घालून, काळे कारनामे करत मिरवणारे हे कावळे खऱ्या अर्थाने लोकांचे शोषण करणारे आधुनिक राक्षस आहेत. या कष्टकरी लोकांचे वर्णन करतांना कवी सय्यद अलाउद्दीन आपल्या 'उचल कोयता तोडीला' या कवितेत

उसाचा तो फड पेटे ढणा ढणा। तसे माझे मना भूक अग्नी ॥
इथे उस मोळी तिथे कारखाना। मध्ये बैल घाणा अमुचाच ॥

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

हिरवा हिरवा जरी उस मळा। आतड्याला पिळा बसे घट्ट ॥ ७

असे या लोकांचे हृदय पिळवटून टाकणारे चित्रण वाचतांना वरील कथेतील दुध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्याची अवस्था उजागर होते. ही कथा वाचकांना अंतर्मुख करायला लावतांना त्याच्या डोळ्याच्या कडा ओलावतात.

सारांश:

इसवीसनाच्या नव्वदीनंतर भारताने स्वीकारलेल्या खाजगीकरण, जागतिकीकरण, आणि उदारीकरणाने भारताची आर्थिक नाडी असणारी शेती आणि त्यावर अवलंबून असणारा शेतकरी या दोघांनाही असहाय करून टाकले. शेतीवर अवलंबून असणारा शेतकरी इथल्या व्यवस्थेने पुरता पिळून खाल्ला आहे, गिळून टाकला आहे. सहकार धोरणाने उभी राहिलेली कारखानदारी भ्रष्टाचाराचे कुरण झाले आहे. साखर कारखाने आणि दुध डेअरीसारख्या अस्थापना शेतकरी, गोरगरीब लोकांना दिवसाढवळ्या लुटण्याची साधने झाली आहेत. शेतकऱ्याचे जीवन ज्या कारखान्यावर अवलंबून होते ते कारखानेच त्यांचे शोषण करू लागले आहेत. खरे मालक असणारे शेतकरी टरफल झाले तर कारखानदार गब्बर झाले आहेत. सहकाराने इथल्या समाजव्यवस्थेची केलेली पिळवणूक खोत सरांच्या कथेतून प्रकर्षाने आपल्यासमोर येतांना वाचकांचे आणि त्याबरोबरीने व्यवस्थेचे डोळे उघडायला भाग पाडते.

संदर्भ:

१. *मराठी विश्वकोश*सहकार/अर्थशास्त्र https://vishwakosh.marathi.gov.in/34035.

२. कैलास दौंड, *पाणधुई*. शांदी प्रकाशन, पुणे, २००४.

३. आप्पासाहेब खोत, *काळीज विकल्याची गोष्ट*, मलपृष्ठ. ललित पब्लिकेशन, २०२२.

४. तत्रैव, पृष्ठ २९.

५. तत्रैव, पृष्ठ ३०.

६. तत्रैव, पृष्ठ ३१.

७. सय्यद अल्लाउद्दिन, *उचल कोयता तोडीला*, पृष्ठ १. दिजान प्रकाशन, आष्टी, २०१४.

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani